**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा ,**
**शिवाजीनगर, पुणे - ४११००४**

**परिपत्रक क्र.रा.मं/पापुई/उच्चीकृत अभ्यासक्रम/मूल्यमापन योजना/१४८३,**
**दिनांक - ११ मार्च २०११**

विषय : माध्यमिक स्तरावरील (इ. १०वी) 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' व गणित (बीजगणित व भूमिती ) या विषयांच्या उच्चीकरण केलेल्या अभ्यासक्रमाच्या व प्रचलित अभ्यासक्रमातील सामान्य गणित (भाग १ व भाग २) या विषयाच्या सुधारित मूल्यमापन योजनेबाबत.

राज्यातील सर्व माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, प्रचलित माध्यमिक अभ्यासक्रमातील विज्ञान आणि तंत्रज्ञान व गणित (बीजगणित व भूमिती) या विषयांच्या अभ्यासक्रमाचे उच्चीकरण (upgraded) करण्यात आले असून उच्चीकरण केलेल्या अभ्यासक्रमास शासनाने त्यांच्या पत्र क्र. एस.एस.सी - २००९ / (२१०/०९) उमाशि २, दि. २३ डिसेंबर २००९ अन्वये मान्यता दिलेली असून त्यानुसार उच्चीकरण केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी इ. ९वी साठी जून २०१० पासून सुरु झाली आहे. इ. ९वी ची सुधारित मूल्यमापन योजना मंडळाच्या परिपत्रक क्र.रा.मं/पापुई/ उच्चीकरण अभ्यासक्रम/ ४०६९ दि. १०/६/२०१० च्या परिपत्रकान्वये यापूर्वीच कळवण्यात आलेली आहे.

उच्चीकरण केलेल्या इ.१०वी विज्ञान आणि तंत्रज्ञान व गणित (बीजगणित व भूमिती ) या विषयांच्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी जून २०११ पासून होणार असल्यामुळे उपरोक्त विषयांच्या उच्चीकरण केलेल्या अभ्यासक्रमाची इ १० वी ची मंडळाची प्रथम परीक्षा मार्च २०१२ मध्ये होईल. इ १० वी च्या सुधारित मूल्यमापन योजनेस शासनाने त्यांच्या क्र. एस.एस.सी २००९ (२१०/०९) उमाशि-२, दि. २२ ऑक्टोबर २०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. बीजगणित व भूमिती या विषयांची मूल्यामापन योजना सुधारित करण्यात आलेली असल्यामुळे त्यास पर्याय म्हणून असलेल्या प्रचलित सामान्य गणित (भाग-१ व भाग २) या विषयाचा अभ्यासक्रम न बदलता फक्त मूल्यमापन योजना सुधारित केली आहे. इ. १० वी साठी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ या कालावधीत होत असल्याने इ. १० वी ची सुधारित मूल्यमापन योजना खालीलप्रमाणे राहील.

## इ. १० वी गणित (बीजगणित व भूमिती)

### लेखी परीक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| बीजगणित | - | ६० गुण | वेळ २ तास ३० मिनिटे |
| भूमिती | - | ६० गुण | वेळ २ तास ३० मिनिटे |
| अंतर्गत मूल्यमापन | - | ३० गुण | |
| एकूण | - | १५० गुण | |

**अंतर्गत मूल्यमापन -**

अंतर्गत मूल्यमापनाच्या ३० गुणांमध्ये :

**गृहपाठ - १० गुण** (बीजगणित व भूमिती प्रत्येकी ५ गृहपाठ १० गुणांचे घेऊन १०० गुणांचे १० गुणांत रुपांतर करणे.)

**पहिली घटक चाचणी - १० गुण** (बीजगणित व भूमिती साठी प्रत्येकी ३० गुणांची चाचणी घेऊन ६० गुणांचे १० गुणांत रुपांतर करणे.)

**द्वितीय सत्रात बहुपर्यायी प्रश्नांची वर्गांतर्गत चाचणी - १० गुण** (द्वितीय सत्रात बीजगणित व भूमिती साठी प्रत्येकी ३० गुणांची वर्गांतर्गत चाचणी घेऊन ६० गुणांचे १० गुणांत रुपांतर करणे)

अशाप्रकारे अंतर्गत मूल्यमापनासाठी एकूण ३० गुण राहतील.

इ.१०वी ची सराव परीक्षा शालेय स्तरावर घेण्यात यावी परंतु त्याचे गुण अंतर्गत मूल्यमापनामध्ये धरण्यात येऊ नयेत. अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विज्ञान विषयाच्या प्रात्याक्षिक परीक्षेच्या गुणांबरोबर प्रचलित पध्दती प्रमाणेच शाळांनी विभागीय मंडळाकडे पाठवावेत.

पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यासाठी - (अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास) पुनश्च परीक्षेस बसल्यानंतर आधीच्या वर्षाचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण शाळेने पाठवावयाचे असल्यामुळे याबाबतचे रेकॉर्ड शाळेने जपून ठेवणे आवश्यक आहे.

खाजगी विद्यार्थी (Private Students) - खाजगी विद्यार्थ्यासाठी प्रचलित पध्दतीप्रमाणेच गणित स्वाध्याय पुस्तिकेस ३० गुण असतील. स्वाध्याय पुस्तिका संपर्क केंद्रावर विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात येतील. केंद्रप्रमुखांनी स्वाध्याय पुस्तिका तपासण्याची सोय करावी. ही प्रचलित पध्दत कायम राहील.

सुधारित मूल्यमापन योजनेची वैशिष्ठ्ये :

१) बीजगणित व भूमितीसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे लेखी परीक्षेसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका व स्वतंत्र उतरपत्रिका राहतील.

२) उत्तीर्णतेसाठी आवश्यक असलेल्या ३५% गुणांमध्ये **लेखी परीक्षेत किमान २५% गुण प्राप्त होणे आवश्यक म्हणजेच बीजगणित ६० व भूमितीसाठी ६० एकत्रित मिळून १२० गुणांपैकी २५% गुण म्हणजे ३० गुण प्राप्त होणे आवश्यक** आहे.

३) प्रश्नपत्रिकेचा आराखडा देण्यात येणार नाही. त्याऐवजी गुणनिहाय प्रश्नांचे विभाजन देण्यात आलेले आहे. प्रश्नांचा क्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य प्राश्निकांना राहील.

४) संविधान तक्ता देण्यात येणार नाही. प्राश्निकांनी प्रश्नपत्रिका संपादन करताना तो स्वतः तयार करावा.

टीप - बीजगणित व भूमिती या विषयांप्रमाणेच सामान्य गणित ( भाग १ व भाग २) या विषयाची मूल्यमापन योजना उपरोक्त प्रमाणे मार्च २०१२ च्या परीक्षेपासून सुधारित राहील याची नोंद घ्यावी.

mySSC.in

## इ. १० वी विज्ञान आणि तंत्रज्ञान

| | | | |
|---|---|---|---|
| लेखी परीक्षा | - | ६० गुण | वेळ २ तास ३० मिनिटे |
| प्रात्यक्षिक परीक्षा | - | २० गुण | वेळ १ तास ३० मिनिटे |
| बहुपर्यायी परीक्षा | - | २० गुण | वेळ ३० मिनिटे |
| एकूण | - | १०० गुण | |

सुधारित मूल्यमापन योजनेची वैशिष्ट्ये :

१) **लेखी परीक्षेसाठी ६० गुणांची एकच प्रश्नपत्रिका राहील.** त्यासाठी वेळ २तास ३० मिनिटे राहील. प्रश्नपत्रिका जरी एकच असली तरी त्यामध्ये विभाग - अ व विभाग - ब असे दोन विभाग असतील. **दोन्ही विभागांसाठी उतरपत्रिका मात्र स्वतंत्र राहतील.**

२) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ४० गुण आहेत. यात २० गुणांची शालेय स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षा व २० गुणांची बहुपर्यायी प्रश्नपत्रिका प्रात्यक्षिक कौशल्यावर आधारित राहील. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी वेळ १ तास ३० मिनिटे राहील. तर प्रात्यक्षिक कौशल्यावर आधारित होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्नांच्या परीक्षेसाठी वेळ ३० मिनिटे राहील.

३) प्रश्नपत्रिकेतील विभाग अ साठी ३० गुण व विभाग ब साठी ३० गुण राहतील. ६० गुणांच्या लेखी परीक्षेमध्ये भौतिकशास्त्र - २० गुण, रसायनशास्त्र २० गुण व जीवशास्त्र २० गुण अशी विभागणी राहील. त्यातील विभाग - अ मधील ३० गुणांमध्ये भौतिकशास्त्र - २० गुण व रसायनशास्त्र - १० गुण तर विभाग ब मधील ३० गुणांमध्ये रसायनशास्त्र १० व जीवशास्त्र २० गुण असे राहतील.

४) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी मंडळामार्फत बहिस्थ परीक्षक राहणार नाही. शाळांनी त्यांचे स्तरावर अंतर्गत परीक्षकांमार्फत त्यांचे आयोजन करावे. प्रात्याक्षिक परीक्षेबाबतच्या सविस्तर सूचना विभागीय मंडळामार्फत देण्यात येतील.

५) **उत्तीर्णतेसाठी आवश्यक असलेल्या ३५% गुणांमध्ये लेखी परीक्षेत किमान २५% गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. म्हणजे ६० गुणांच्या लेखी परीक्षेत किमान १५ गुण आवश्यक आहेत.**

६) प्रश्नपत्रिकेचा आराखडा देण्यात येणार नाही. त्याऐवजी गुणनिहाय प्रश्नांचे विभाजन देण्यात आलेले आहे. प्रश्नांचा क्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य प्राश्निकांना राहील.

७) संविधान तक्ता दिला जाणार नाही. प्राश्निकांना प्रश्नपत्रिका संपादन करताना तो स्वतः तयार करावयाचा आहे.

mySSC.in

पुनपरीक्षार्थी विद्यार्थ्यासाठी - (अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास) विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांची २० गुणांची प्रात्याक्षिक परीक्षा लेखी परीक्षेबरोबर पुनश्च होणार नसल्याने प्रात्याक्षिक परीक्षेचे गुण व प्रात्याक्षिक कौशल्यावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांच्या आधीच्या परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्यात येणार आहेत व ते गुण शाळेने पुनश्च पाठवायचे असल्याने याबाबतचे रेकॉर्ड शाळेने जपून ठेवणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

खाजगी विद्यार्थी - (Private Students) - खाजगी विद्यार्थ्यांसाठी ४० गुणांसाठी २० गुण प्रात्याक्षिक परीक्षा व उर्वरीत २० गुण मात्र स्वाध्याय पुस्तिकेसाठी असतील. स्वाध्याय पुस्तिका संपर्क केंद्रावर विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात येतील. केंद्रप्रमुखांनी स्वाध्याय पुस्तिका तपासण्याची व्यवस्था गणित विषयाप्रमाणे करावयाची असून ते गुण विभागीय मंडळांना पाठवावयाचे आहेत, याची नोंद घ्यावी.

एकत्रिता उत्तीर्णता - 'गणित' व 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' या विषयांच्या एकत्रित उत्तीर्णतेसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणेच एकत्रित गट असेल. त्यामध्ये कोणताही बदल नाही. **दोन विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी २५० पैकी किमान ८८ गुण व त्यापैकी विज्ञान विषयात १०० पैकी किमान २५ गुण व गणित विषयात १५० पैकी ३८ गुण आवश्यक आहेत.** ही अट प्रचलित पध्दतीप्रमाणे कायम राहील. इ १० वीच्या 'गणित' व 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' या विषयांचा प्रचलित अभ्यासक्रम अभ्यासणाऱ्या मार्च २०११ च्या परीक्षेत प्रथमतः प्रविष्ट होऊन अनुत्तीर्ण झालेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आक्टोबर २०११ व मार्च २०१२ ही परीक्षेची अंतिम संधी राहील. यानंतर अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र उच्चीकरण केलेल्या अभ्यासक्रमानुसार परीक्षेस प्रविष्ट व्हावे लागेल याची नोंद घ्यावी. व याबाबी विद्यार्थ्यांना अगोदरच सूचित करण्यात याव्यात. त्याबाबतच्या सूचना नोटीसबोर्डवर लावण्यात याव्यात.

## मूल्यमापन योजना इ. १० वी गणित ( बीजगणित व भूमिती )

| उद्दिष्टानुसार गुणविभागणी - बीजगणित | | | उद्दिष्टानुसार गुणविभागणी - भूमिती | | |
|---|---|---|---|---|---|
| **उद्दिष्टे** | **गुण** | **शेकडा गुण** | **उद्दिष्टे** | **गुण** | **शेकडा गुण** |
| ज्ञान | ९ | १५ | ज्ञान | ९ | १५ |
| आकलन | ९ | १५ | आकलन | ९ | १५ |
| उपयोजन | ३६ | ६० | उपयोजन | ३० | ५० |
| कौशल्य | ६ | १० | कौशल्य | १२ | २० |
| **एकूण** | **६०** | **१००** | **एकूण** | **६०** | **१००** |

| प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **प्रश्न प्रकार** | **गुण** | **विकल्पासह गुण** | **शेकडा गुण** |
| १ | अतिलघुतरी | ६ | ७ | १०.०० |
| २ | लघुतरी | २२ | २७ | ३६.६७ |
| ३ | दीर्घोतरी | ३२ | ४१ | ५३.३३ |
| | **एकूण** | **६०** | **७५** | **१००.००** |

| गुणनिहाय प्रश्नांचा विभाग ( बीजगणित व भूमिती) | | |
|---|---|---|
| | गुण | विकल्पासह गुण |
| १ गुणांचे ७ पैकी ६ प्रश्न सोडविणे | ६ | ७ |
| २ गुणांचे ६ पैकी ५ प्रश्न सोडविणे | १० | १२ |
| ३ गुणांचे ५ पैकी ४ प्रश्न सोडविणे | १२ | १५ |
| ४ गुणांचे ४ पैकी ३ प्रश्न सोडविणे | १२ | १६ |
| ५ गुणांचे ५ पैकी ४ प्रश्न सोडविणे | २० | २५ |
| | **६०** | **७५** |

टीप - सामान्य गणित ( भाग १ व भाग २ ) साठी गुणनिहाय प्रश्नांचे विभाजन बीजगणित व भूमिती या विषयाप्रमाणेच राहील.

mySSC.in

| घटकानुसार गुणविभागणी - बीजगणित | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **घटकाचे नाव** | **गुण** | **विकल्पासह गुण** |
| १ | अंकगणिती श्रेढी व भूमितीय श्रेढी | १२ | १५ |
| २ | वर्गसमीकरणे | १३ | १६ |
| ३ | दोन चलांतील रेषीय समीकरणे | १४ | १८ |
| ४ | संभाव्यता | ८ | १० |
| ५ | सांख्यिकी (१) | ७ | ८ |
| ६ | सांख्यिकी (२) | ६ | ८ |
| | | ६० | ७५ |

| घटकानुसार गुणविभागणी - भूमिती | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **घटकाचे नाव** | **गुण** | **विकल्पासह गुण** |
| १ | समरुपता | १२ | १५ |
| २ | वर्तुळ | १० | १३ |
| ३ | भौमितिक रचना | १० | १२ |
| ४ | त्रिकोणामिती | १० | १२ |
| ५ | निर्देशक भूमिती | ८ | ११ |
| ६ | महत्वमापन | १० | १२ |
| | | ६० | ७५ |

mySSC.in

**इयत्ता १० वी**
**सामान्य गणित (भाग - १ व भाग -२)**
**(बदलेल्या नवीन मूल्यमापन योजनेनुसार मार्च २०१२ परीक्षेपासून लागू )**

**लेखी परीक्षा**

| | | | |
|---|---|---|---|
| सामान्य गणित भाग - १ | - | ६० गुण | वेळ २ तास ३० मिनिटे |
| सामान्य गणित भाग - २ | - | ६० गुण | वेळ २ तास ३० मिनिटे |
| अंतर्गत मूल्यमापन | - | ३० गुण | |

---

एकूण - १५० गुण

---

**उद्दिष्टानुसार गुणविभागणी**

| **उद्दिष्टे** | **गुण** | **शेकडा गुण** |
|---|---|---|
| ज्ञान | ६ | १० |
| आकलन | २२ | ३५ |
| उपयोजन | २० | ३५ |
| कौशल्य | १२ | २० |
| | ६० | १०० |

**प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी**

| **प्रश्नप्रकार** | **गुण** | **विकल्पासह** | **शेकडा गुण** |
|---|---|---|---|
| अतिलघुतरी | ६ | ७ | १० |
| लघुतरी | २२ | २७ | २७ |
| दीर्घोतरी | ३२ | ४१ | ५३ |
| | ६० | ७५ | १०० |

mySSC.in

| सामान्य गणित भाग - १ | | | | सामान्य गणित भाग -२ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **प्रकरण** | **एकूण गुण (६० पैकी)** | **विकल्पासह (७५ पैकी)** | | **प्रकरण** | **एकूण गुण (६० पैकी)** | **विकल्पासह (७५ पैकी)** |
| १ | दोन चलांतील रेषीय समीकरणे | ९ | ११ | १ | प्रमाणाचे मूलभूत प्रमेय | ५ | ६ |
| २ | वर्गसमीकरणे | ९ | १२ | २ | समरुपता | ७ | ९ |
| ३ | चलन | ८ | १० | ३ | पायथागोरसचे प्रमेय | १० | १२ |
| ४ | अंकगणिती श्रेढी | ९ | ११ | ४ | वर्तुळ : जीवा व स्पर्शिका | ८ | १० |
| ५ | सांख्यिकी १ | ९ | ११ | ५ | भौमितीक रचना | ८ | १० |
| ६ | सांख्यिकी २ | ८ | १० | ६ | महत्वमापन | १२ | १५ |
| ७ | संभाव्यता | ८ | १० | ७ | व्यावहारिक गणित | १० | १३ |
| | **एकूण** | **६०** | **७५** | | **एकूण** | **६०** | **७५** |

टीप :

(१) बीजगणित व भूमिती या विषयाप्रमाणेच सामान्यगणित भाग - १ व भाग -२ साठी गुणनिहाय प्रश्नांचे विभाजन राहील.

(२) गणित विषयाचे अतिलघुतरी प्रश्न हे वस्तुनिष्ठ प्रकारचे नसावेत. उदा गाळलेल्या जागा भरा, जोड्या लावा, सत्य व असत्य इ प्रकारचे नसावेत. सदर प्रश्नांचे उतर किमान एका वाक्यात येईल असे प्रश्न असावेत.

(३) प्रश्नपत्रिकेतील प्रश्न पाठ्यपुस्तकातील असतीलच असे नाही. परंतु ते प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे नसावेत.

## मूल्यमापन योजना १० वी विज्ञान आणि तंत्रज्ञान

| उद्दिष्टानुसार गुणविभागणी | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **प्रश्न प्रकार** | **गुण** | **विकल्पासह गुण** | **शेकडा गुण** |
| १ | ज्ञान | १३ | १३ | २२ |
| २ | आकलन | १५ | १८ | २५ |
| ३ | उपयोजन | २७ | ४० | ४५ |
| ४ | कौशल्य | ५ | ५ | ८ |
| | **एकूण** | **६०** | **७६** | **१००** |

| प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **प्रश्न प्रकार** | **गुण** | **विकल्पासह गुण** | **शेकडा गुण** |
| १ | वस्तुनिष्ठ | १४ | १४ | २३.३३ |
| २ | अतिलघुतरी | १२ | १२ | २०.०० |
| ३ | लघुतरी | २४ | ३० | ४०.०० |
| ४ | दीर्घोतरी | १० | २० | १६.६७ |
| | एकूण | ६० | ७६ | १००.०० |

mySSC.in

| घटकानुसार गुणविभागणी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **घटकाचे नाव** | **गुण** | **विकल्पासह गुण** |
| १ | शाळा मूलद्रव्यांची | ३ | ४ |
| २ | जादू : रासायनिक अभिक्रियांची | ४ | ४ |
| ३ | रसायन : आम्ल आम्लरीचे | ३ | ४ |
| ४ | तेज : विजेचे | ६ | ८ |
| ५ | सर्व काही : विद्युतचुंबकत्वाविषयी | ४ | ५ |
| ६ | चमत्कार : प्रकाशाचा भाग १ | ६ | ८ |
| ७ | चमत्कार : प्रकाशाचा भाग २ | ४ | ५ |
| ८ | जाणू या धातू - अधातू | ५ | ६ |
| ९ | अद्भुत जग : कार्बनी संयुगाचे | ५ | ६ |
| १० | रहस्य : अंतर्गत जीवनाचे | ६ | ८ |
| ११ | नियमन : जीवनाचे | ४ | ५ |
| १२ | चक्र : जीवनाचे | ५ | ६ |
| १३ | आरेखन : आपल्या जनुकांचे | ५ | ७ |
| | | **६०** | **७६** |

**गुणनिहाय प्रश्नांचे विभाजन**

विभाग 'अ' व 'ब' मध्ये प्रत्येकी एकूणच ४ प्रश्न राहतील. त्याचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

- १ गुणांचे ७ प्रश्न विचारणे - ७ सोडविणे - एकूण गुण ७
- २ गुणांचे ३ प्रश्न विचारणे - ३ सोडविणे - एकूण गुण ६
- ३ गुणांचे ५ प्रश्न विचारणे - ४ सोडविणे - एकूण गुण १२
- ५ गुणांचे २ प्रश्न विचारणे - १ सोडविणे - एकूण गुण ५

फक्त गुणनिहाय प्रश्नांचे विभाजनाप्रमाणे प्रश्नपत्रिका संपादन होणे अपेक्षित आहे. या गुणनिहाय प्रश्नांमध्ये कोणकोणत्या प्रश्नांचा समावेश होतो त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) खालील प्रश्न सोडवा (प्रत्येकी एक गुण) (फक्त सात उपप्रश्न द्यावेत.)

i. रिकाम्या जागा भरा.
ii. वेगळा घटक ओळखा.
iii. सहसंबंध ओळखा.
iv. जोडी जुळवा.
v. चूक की बरोबर लिहा.
vi. एका वाक्यात उतर लिहा.
vii. नाव लिहा / रेणूसुत्र लिहा.
viii. एकक लिहा.

२) पुढील उपप्रश्न सोडवा (प्रत्येकी २ गुण) (फक्त तीन प्रश्न विचारावेत.)

i. शास्त्रीय कारण लिहा.
ii. नामनिर्देशित आकृत्या काढा व आकृती दुरुस्त करून काढा.
iii. टीपा लिहा.
iv. संतुलित रासायनिक समीकरण स्पष्टीकरणासह लिहा.
v. नियम व व्याखा लिहा.
vi. उदाहरण सोडवा.
vii. फरक स्पष्ट करा.
viii. तक्ता पूर्ण करा.
ix. गुणधर्म व उपयोग लिहा.

३) खालीलपैकी चार उपप्रश्न सोडवा (प्रत्येकी ३ गुण) (पाच प्रश्न विचारावेत.)

i. दोन उदाहरणे देऊन एक स्पष्ट करा.
ii. व्याखा / नियम लिहून उदाहरणासह स्पष्ट करा.
iii. फायदे / तोटे लिहा.
iv. स्पष्ट करा.

४) पुढील दोन पैकी एक उपप्रश्न सोडवा (प्रत्येकी ५ गुण)

i. सिध्द करा.
ii. आकृतीसह कार्य स्पष्ट करा.
iii. उच्चतम पातळीचा उपप्रश्न.
iv. दीर्घोतरी प्रश्न.
v. खालील मुद्यांच्या आधारे वर्णन करा.
   १) तत्व २) आकृती ३) रचना ४) कार्य ५) उपयोग
vi. परिच्छेदावर आधारित प्रश्न .

टीप -  वरील आराखडा नमुन्यादाखल दिलेला आहे. एकदा विचारलेल्या उच्चतम मानसिक क्षमतेचा प्रश्न पुढच्या परीक्षेसाठी उच्चतम मानसिक क्षमतेचा प्रश्न ठरत नाही. प्रश्नप्रकाराचा क्रम व प्रश्नप्रकारात सातत्याने बदल असावा.

तरी उपरोक्त मूल्यमापन योजना सर्व संबंधित विद्यार्थी  व शिक्षक यांचे तात्काळ निर्देशनास आणावी व संबंधित परिपत्रक शाळेच्या सूचना फलकावर लावण्यात यावे.

सचिव
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे - ४११००४

mySSC.in